MHRG070005272021

| | |
|---|---|
| केस दाखल दिनांक | १०/०५/२०२१ |
| केस नोंदणी दिनांक | १०/०५/२०२१ |
| केस निकाल दिनांक | १०/०६/२०२६ |
| कालावधी | वर्ष महिने दिवस |
| | ०५ ०० ०१ |

**न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत, जि. रायगड यांचे न्यायालयात**
**(पिठासीन अधिकारी – श्रीमती ए. एस. वाडकर)**

**संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१४२/२०२१**
**निशाणी क्र. २०/ब**

| | |
|---|---|
| प्रथम खबरी अहवालाचा तपशील<br>गुन्हा नोंद क्रमांक : ०४/२०२१, दिनांक १४/०३/२०२१<br>पोलीस स्टेशन : माथेरान पोलीस स्टेशन,<br>ता. कर्जत, जि. रायगड | |
| तक्रारदार/खबरी | स्वरा बाबुराव शिळवणे<br>वय : ३२ वर्षे, |
| महाराष्ट्र शासनतर्फे | श्री. प्रदिप शिरसाट, सहा. सरकारी अभियोक्ता |
| आरोपी | **अनिकेत सूर्यकांत वाघमारे**<br>वय :२६ वर्षे, धंदा : सिव्हील कॉन्टॅक्टर,<br>रा. श्रीधर एन्क्लेव, रो हाऊस नं.३,<br>बाबदेव मंदीर रोड, वलवण<br>ता. मावळ, जि. रायगड |
| आरोपींतर्फे वकील | श्री. कैलास मोरे |

**(भाग "ब")**

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याची तारीख | १६/०१/२०२० ते ७/०३/२०२१ |
| गुन्हा नोंदणी तारीख | १४/०३/२०२१ |
| दोषारोपपत्र दाखल तारीख | १०/०५/२०२१ |

| | |
|---|---|
| दोषारोप निश्चित तारीख | २९/०९/२०२१ |
| पुरावा सुरु झाल्याची तारीख | १५/०५/२०२६ |
| न्यायनिर्णय राखीव ठेवल्याची तारीख | ... |
| न्यायनिर्णय घोषित केल्याची तारीख | १०/०६/२०२६ |
| शिक्षा दिल्याची तारीख, जर असेल तर | निरंक |

| अ.क्र. | आरोपीचे नाव | अटक तारीख | जामीनावर सोडल्याची तारीख | गुन्हा ठेवल्याचा तपशील | शिक्षा दिली किंवा निर्दोष मुक्तता | किती शिक्षा दिली | खटला सुरु असताना आरोपी कारागृहात असल्याबाबतचा तपशील |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | अनिकेत सूर्यकांत वाघमारे | २२/०३/२०२१ | ३०/०४/२०२१ | भारतीय दंड विधान संहिता कलम ४१७ | निर्दोष मुक्तता | निरंक | निरंक |

## (भाग "क")

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे साक्षीदारांचा तपशील** :-

**अभियोग पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांची नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | स्वरा बाबूराव शेळवणे | १६ |
| २ | कमल बाबूराव शेळवणे | १९ |

**आरोपी पक्षाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे साक्षीदार**

| अ.क्र. | साक्षीदारांचे नावे | निशाणी क्रमांक |
|---|---|---|

| | | |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**अभियोग पक्ष / आरोपी / न्यायालय यांचे कागदपत्रांचा तपशील** :–

**अभियोग पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १ | फिर्याद | १७ |
| २ | छापील फिर्याद | १८ |

**आरोपी पक्षाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**न्यायालयाचे कागदपत्र**

| अ.क्र. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| | निरंक | निरंक |

**मुद्देमालाचा तपशील** :–

| अ.क्रं. | तपशील | निशाणी क्रमांक |
|---|---|---|
| १. | निरंक | निरंक |

## न्यायनिर्णय
## (जाहीर दिनांक १०/०६/२०२६)

प्रस्तुत खटला आरोपींविरुध्द भारतीय दंड विधान संहिता, कलम ४१७ अन्वये चालविण्यात आला.

**अभियोग पक्षाची थोडक्यात हकीकत खालीलप्रमाणे –**

०२. अभियोग पक्षाची हकीकत थोडक्यात अशी की, फिर्यादी महिला हिने दिलेल्या तक्रारीनुसार तिची आरोपी अनिकेत सूर्यकांत वाघमारे याच्याशी ओळख होऊन त्यांच्यात प्रेमसंबंध निर्माण झाले. आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आश्वासन दिले व त्या विश्वासावरून तिच्याशी जवळीक साधली. आरोपी हा फिर्यादीच्या घरी ये–जा करीत होता तसेच फिर्यादीच्या कुटुंबीयांशी देखील परिचित झाला होता. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपीने तिला माथेरान येथील “Matheran Sun & Shade” हॉटेलमध्ये नेले व तेथे तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. त्यावेळी आरोपीने आपण तिच्याशी विवाह करणार असल्याचे सांगून तिची समजूत काढली. त्यानंतर आरोपीने वेळोवेळी तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले. फिर्यादीच्या म्हणण्यानुसार आरोपीने तिच्यासोबत विवाह करण्याचे आश्वासन दिले होते. मात्र नंतर आरोपीने इतर ठिकाणी साखरपुडा केल्याचे फिर्यादीस बाहेरून समजले. त्याबाबत फिर्यादीने आरोपीकडे विचारणा केली असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली व लग्न करण्यास टाळाटाळ केली. फिर्यादीच्या आरोपानुसार आरोपीने सुरुवातीपासूनच खोटे आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केला व तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून तिची फसवणूक केली. त्यामुळे फिर्यादीने आरोपीविरुद्ध सदर गुन्हा दाखल केला आहे.

०३. सदर फिर्यादीवरुन गुन्हा नोंद क्र. ०४/२०२१, भारतीय दंड संहितेचे कलम ४१७ अन्वये गुन्हा नोंदविला गेला. तपासीक अंमलदार यांनी तपासामध्ये फिर्यादीचा जबाब नोंदविला, साक्षीदारांची टिपणे नोंदविली, तपास पुर्ण होताच आरोपींविरुध्द सबळ पुरावा आल्याने वरील कलमांन्वये दोषारोपपत्र दाखल केले.

०४. आरोपी यांचेविरुध्द भारतीय दंड विधान संहितेचे कलम ४१७ अन्वये निशाणी क्र.८ प्रमाणे आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. आरोपीला गुन्हयाचे विवरण त्याचे मातृभाषेत वाचुन व समजावून सांगितले असता आरोपींनी आरोप नाकारुन संपरिक्षेची मागणी केली. संपरीक्षेदरम्यान आरोपींविरुध्द गुन्हादर्शक पुराव्याची नोंद झालेली नसल्याकारणाने आरोपींचा फौजदारी प्रक्रिया संहितेचे कलम ३१३ अन्वये नोंदविण्यात येणारा जबाब वगळण्यात आलेला आहे.

०५. आरोपीतर्फे विधीज्ञांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाचा पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपी हे निर्दोषमुक्त होण्यास पात्र असल्याचे दिसुन येते. सदर विधीज्ञांनी आरोपीला निर्दोषमुक्त करण्याची विनंती केली.

०६. अभियोग पक्षातर्फे सहा. सरकारी अभियोक्ता यांनी असा युक्तीवाद केला की, अभियोग पक्षाचा पुरावा लक्षात घेता शिक्षा करण्याची विनंती केली आहे.

०७. फिर्यादी पक्षाचा पुरावा व दोन्ही बाजुंचा युक्तीवाद ऐकल्यानंतर खालील मुद्दे माझ्यासमक्ष उपस्थित होत असून त्यांचे निष्कर्ष व त्यासाठीचे कारणे खालीलप्रमाणे देत आहे.

| अ.नं. | मुद्दे | | निष्कर्ष |
|---|---|---|---|
| १. | अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आश्वासन दिले व त्या विश्वासावरून तिच्याशी जवळीक साधली, आरोपीने फिर्यादीला माथेरान येथील “Matheran Sun & Shade” हॉटेलमध्ये नेले व तेथे तिच्याशी शारीरिक संबंध | | नकारार्थी. |

| | | | |
|---|---|---|---|
| | ठेवले, त्यावेळी आरोपीने आपण तिच्याशी विवाह करणार असल्याचे सांगून तिची समजूत काढली, त्यानंतर आरोपीने वेळोवेळी तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले, मात्र नंतर आरोपीने इतर ठिकाणी साखरपुडा केल्याचे फिर्यादीस बाहेरून समजले, त्याबाबत फिर्यादीने आरोपीकडे विचारणा केली असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली व लग्न करण्यास टाळाटाळ केली, आरोपीने सुरुवातीपासूनच खोटे आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केला व तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून तिची फसवणूक केली ? | | |
| २. | काय आदेश ? | | **आरोपींची निर्दोष मुक्तता करण्यात आली.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा क्र.१ बाबत** –

०८. अभियोग पक्षातर्फे फिर्यादी स्वरा बाबूराव शेळवणे (साक्षीदार क्र.१ – निशाणी क्र.१६) यांची साक्ष नोंदविण्यात आली. घटना काय घडली होती ते त्यांना आता आठवत नाही. त्यांनी गैरसमजुतीतुन फिर्याद दाखल केली होती. आरोपी हा त्यांच्या भावाचा मित्र असल्यामुळे त्यांची त्यांच्याशी ओळख झाली, फेब्रवारी २०१९ मध्ये आरोपीसोबत आरोपीच्या सांगण्यावरुन त्या माथेरान येथे गेल्या, तेथे त्यांच्यामध्ये शारिरीक संबंध प्रस्थापित झाले, त्यानंतर मे २०१९ मध्ये गुरुकृपा बिल्डींग, आयसीआयसी बॅकच्या पाठीमागे फलॉट घेतला, तेथे त्याने त्यांच्या गळ्यात मंगळसुत्र घातले, त्यानंतर आम्ही तेथे एक वर्ष राहिलो, त्यानंतर त्यांना बाहेरुन अनिकेतचा साखरपुडा झाल्याचे कळाले, त्यानंतर त्याबाबत अनिकेतला जाब विचारला असता, त्याने ते तुझ्याशी लग्न करणार आहे, असे सांगितले

परंतु, रितसर लग्न केले नाही, अशा प्रकारे त्याने त्यांची फसवणुक केली, असे काहीही घडले नाही. आरोपीतर्फे वकिलांनी फिर्यादीचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे, दिनांक ०७/०३/२०२१ रोजी तक्रार दिल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती. कोर्टाबाहेर त्यांची आरोपीसोबत तडजोड झालेली आहे. त्यांना सदर प्रकरणी साक्षीदार तपासायचे नाहीत.

०९. अभियोग पक्षातर्फे कमल बाबूराव शेळवणे (साक्षीदार क्र.२ – निशाणी क्र.१९) यांची साक्ष नोंदविण्यात आली. घटना काय घडली होती ते त्यांना आता आठवत नाही. आरोपी हा त्यांच्या मुलाचा मित्र असल्यामुळे त्याची व त्यांच्या मुलीची ओळख झाली, फेब्रवारी २०१९ मध्ये आरोपीसोबत आरोपीच्या सांगण्यावरुन त्यांची मुलगी माथेरान येथे गेली, तेथे त्यांच्यामध्ये शारिरीक संबंध प्रस्थापित झाले, त्यानंतर मे २०१९ मध्ये गुरुकृपा बिल्डींग, आयसीआयसी बँकच्या पाठीमागे फलॉट घेतला, तेथे त्याने त्यांच्या गळ्यात मंगळसुत्र घातले, त्यानंतर ते तेथे एक वर्ष राहिले, त्यानंतर त्यांच्या मुलीला बाहेरुन अनिकेतचा साखरपुडा झाल्याचे कळाले, त्यानंतर त्याबाबत अनिकेतला जाब विचारला असता, त्याने त्यांच्या मुलीला, तुझ्याशी लग्न करणार आहे, असे सांगितले. परंतु, रितसर लग्न केले नाही, अशा प्रकारे त्याने तिची फसवणुक केली, असे काहीही घडले नाही. त्यांची आरोपीसोबत तडजोड झालेली आहे. आरोपीतर्फे वकिलांनी फिर्यादीचा उलटतपास घेतला. त्यामध्ये त्यांनी असे कथन केले आहे, दिनांक ०७/०३/२०२१ रोजी त्यांच्या मुलीने तक्रार दिल्याप्रमाणे कोणतीही घटना घडली नव्हती.

१०. अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.१ फिर्यादी व साक्षीदार क्रं.२ यांची साक्ष लक्षात घेता खटल्याची पुढील कारवाई निरर्थक ठरेल या हेतुने अभियोग पक्षाची पुराव्याची बाजु बंद करण्यात आली.

११. वरील साक्षीदारांच्या साक्षी पुराव्याचे अवलोकन केले असता आरोपींकडून कोणतीही कृती घडल्याबाबत कोणताही पुरावा न्यायालयासमोर आलेला नाही. साक्षीदार क्र.१ फिर्यादी यांनी सदर प्रकरणातील आरोपींचा सहभाग नाकारून जबाबामध्ये कथन केलेप्रमाणे कोणतेही घटना घडली नसल्याचे सांगितले आहे. अभियोगपक्ष आरोपींविरुध्द गुन्हा सबळ पुराव्याअभावी सिध्द करु शकला नाही. त्यामुळे आरोपी हे संशयाचा फायदा मिळण्यास पात्र आहे.

१२. वर नमुद पुराव्याचे अवलोकन केले असता अभियोग पक्षाने हे सिध्द केले काय की, आरोपीने फिर्यादीस लग्नाचे आश्वासन दिले व त्या विश्वासावरून तिच्याशी जवळीक साधली, आरोपीने फिर्यादीला माथेरान येथील “Matheran Sun & Shade” हॉटेलमध्ये नेले व तेथे तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले, त्यावेळी आरोपीने आपण तिच्याशी विवाह करणार असल्याचे सांगून तिची समजूत काढली, त्यानंतर आरोपीने वेळोवेळी तिच्याशी शारीरिक संबंध ठेवले, मात्र नंतर आरोपीने इतर ठिकाणी साखरपुडा केल्याचे फिर्यादीस बाहेरून समजले, त्याबाबत फिर्यादीने आरोपीकडे विचारणा केली असता आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली व लग्न करण्यास टाळाटाळ केली, आरोपीने सुरुवातीपासूनच खोटे आश्वासन देऊन तिचा विश्वास संपादन केला व तिच्याशी शारीरिक संबंध ठेवून तिची फसवणूक केली, याबाबत कुठलाही ठोस पुरावा आलेला नाही. सबब, मी मुद्दा क्र.१ चे उत्तर नकारार्थी देत आहे.

**मुद्दा क्र.२ बाबत** –

१३. प्रस्तुत प्रकरणात अभियोग पक्ष हा आरोपींचा गुन्हा सिध्द करण्यास पूर्णतः अपयशी ठरला आहे. त्यामुळे आरोपी निर्दोष मुक्त होण्यास पात्र आहे. वरील सर्व बाबींचा विचार करता, मुद्दा क्र.५ च्या निष्कर्षान्वये मी खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

## आदेश

| | |
|---|---|
| १. | आरोपी **अनिकेत सूर्यकांत वाघमारे** यांना भारतीय दंड संहितेचे कलम ४१७ या गुन्हयातुन फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५ (१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे. |
| २. | आरोपींची जामीन व बंधपत्रे रद्द करण्यात येतात. |
| ३. | सदर खटल्यामध्ये जप्त मुद्देमाल काहीही नाही सबब, आदेश नाही. |
| ४. | या न्यायनिर्णयाविरुध्द वरिष्ठ न्यायालयात अपील झाल्यास त्याकामी हजर होणेकरिता आरोपी यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता कलम ४३७(अ) नुसार प्रत्येकी रक्कम रुपये १५,०००/– चे वैयक्तिक बंधपत्र द्यावयाचे आहे. |
| ५. | प्रकरण बंद करण्यात येते.<br>(न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.) |

ASAVARI SURESH WADKAR
Digitally signed by ASAVARI SURESH WADKAR
Date: 2026.06.10 18:12:36 +0530

दिनांक – १०/०६/२०२६

(श्रीमती ए. एस. वाडकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग, कर्जत,
जि. रायगड